Email ID: rdc.palghar-mh@gov.in

# OFFICE OF THE COLLECTOR AND DISTRICT MAGISTRATE PALGHAR

No.Home/Desk-1/T-3/Kavi-511/2021 Date :24/06/2021

To,

The Deputy Register,

Hon'ble National Green Tribunal,

Principal Bench, Faridkot House,

Copernicus Marg, New Delhi -110001

**Sub : Blast in firecrackers unit at Village Dehane, Tal.Dahanu, Dist. Palghar State-Maharashtra.**

**Ref : 1) Your Email notice Dated 18/06/2021.**

**2) Letter no. mahsul/sankirn/kavi-219/2021 dated 18/06/2021 from the Tahsildar dahanu.**

Respected Sir/Madam,

Regarding to above subject a report has been submitted by Tahsildar Dahanu vide letter ref.no.2 that the fire at firecracker company situated at Village Dahane, Taluka Dahanu, District Palghar, State-Maharashtra. Presenting the detail report of it as per the follow:

The firecrackers company named 'Vishal Fire Works' is situated at land bearing Gat no.154 admeasuring area of 3810.00 Square Meter, Village Dahane, Taluka Dahanu, District Palghar, State-Maharashtra. This land is owned by Shri. Naresh Karnawat and others and also there are more six godowns. On Dated 17/06/2021 at morning 10.35 a.m. while the welding work was going on in the Company and the sparks flying from the welding work was fell on twin bundles which were brought for making the firecrackers, the packing box the liquor powder for making the firecrackers and fire was started. The fire was extinguished by fire brigade till 4.00 pm. The owner of the company has been owned two licenses from the Explosive Department, C.B.D. Belapur, New Mumbai. The details of that licenses are as 1) E/WCC/MH/20/67(E22263) valid till 31/03/2023 and 2) E/WCC/MH/24/128(E14899) valid till 31/03/2026. It was informed that the copies of this licenses were burned and destroyed in the fire.

In this incident the Eight persons were injured and they were admitted to 'Seva Nursing Home' Dahanu and 'Sankalp Nursing Home' Dahanu for the medical treatment. There details are as follows:

| Sr. No. | Name | age | injury |
|---|---|---|---|
| 1 | Navnit Lote | 32 | 50% |
| 2 | Mahesh Ramji More | 40 | 40% |

Parshavnath 9, Bidco Naka, Dist. Palghar. Pincode - 401 404.

Contact No: 02525 - 253111 ▪ Email: collector.palghar-mh@gov.in ▪ website: palghar.gov.in

| | | | |
|---|---|---|---|
| 3 | Asif Khan | 32 | 35% |
| 4 | Prmchand Ishwar Chauhan | 25 | 20% |
| 5 | Sukhdev Charansingh Lothe | 50 | 25% |
| 6 | Mangesh Radkya Rayat | 35 | 40% |
| 7 | Sunil Ganpat Kathya | 30 | 40% |
| 8 | Ajit Jayesh Dalvi | 17 | 30% |

The offence has been registered u/s 308, 34 of IPC by FIR No.155/2021 in the Dahanu Police Station against 1) Urmilaben Jethamal Shah having residence at Kesharimalwadi, near to Marathi School, Jakeria road, Malad East, Mumbai 2) Naresh Mohanalal Karnavat having residence at Sawata, Tal: Dahanu, Dist: Palghar and 3) Navdeep Darshan Lote Having Residence address Anand Vilas Bunglow , Patelpada, Dahanu and the under investigation.

This is submitted for your kind information.

Enclose: as above

(Dr.Kiran Mahajan)
**Additional District Magistrate**
**Palghar**

(O.C. signed by D.M.)

May
inr

# तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, डहाणू यांचे कार्यालय

डहाणू फोर्ट, डहाणू गाव, डहाणू पिन कोड : ४०१६०१
दूरध्वनी क्र : ०२५२८-२२११८२ ई-मेल : tahdahanu@gmail.com

क्र./महसूल/संकीर्ण/कावि-२१९/२०२१

दिनांक :१८/०६/२०२१.

प्रति,

मा. जिल्हाधिकारी पालघर
(सामान्य शाखा)

विषय:- मौजे डेहणे, ता.डहाणू जि.पालघर येथील फटाका कंपनीला आग लागलेबाबत.

संदर्भ:- १.तलाठी सजा आगवन यांचेकडील अहवाल क्र.वानी/२३३/२०२१ दि.१७/०६/२०२१.
२.या कार्यालयाकडील प्राथमिक अहवाल क्र.महसूल/संकीर्ण/कावि-२१८/२०२१, दि.१७/०६/२०२१.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये सादर करणेत येते की, मौजे डेहणे, ता.डहाणू, जि.पालघर येथील श्री.नरेश कर्णावट व इतर यांच्या मालकीच्या गट क्र.१५४, क्षेत्र ३८१०.०० चौ.मी जागेमध्ये विशाल फायर वर्क्स ही फटाके बनविणेची कंपनी आहे. सदर कंपनीमध्ये दि.१७.०६.२०२१ रोजी सकाळी १०.३५ वाजता वेल्डींगचे काम सुरू असताना ठिणगी पडून आग लागलेली होती. डहाणू नगर परिषद, अदानी थर्मल पॉवर स्टेशन व तारापूर एम.आय.डी.सी यांचे अग्निशामक दलामार्फत दुपारी ४.०० वाजता आग आटोक्यात आलेली आहे. कंपनीचे मालक श्री.कर्नावट यांना लायसन्स बाबत विचारणा केली असता एक्सझिक्युटीव्ह लायसन्स क्र. १) E/WCC/MH/२०/६७(E२२२६३) असा असून त्याची मुदत दि.३१.०३.२०२३ व २) E/WCC/MH/२४/१२८(E१४८९९) असा असून त्याची मुदत दि.३१.०३.२०२६ रोजी पावेतो लायन्सस रजिस्ट्रेशन केले आहे. हे लायसन्स सी.बी.डी बेलापूर येथून घेतलेले आहे. परंतु सदरची प्रत त्यांचेकडे मागितले असता कंपनीच्या आगीमध्ये जळाल्याचे सांगितले आहे. सोबत जागेचा स्थळदर्शक हातनकाशा जोडणेत आलेला आहे.

सदर ठिकाणी पाहणी केली असता पावसाळयाच्या दृष्टीने तेथे मान्सून शेड तयार करीत होते. तेथे फटाके बनविणेचे ६ छोटे छोटे गोडाऊन होते. त्या सर्व गोडाऊनला आग लागून सर्व गोडाऊनचे नुकसान झालेले आहे. सदर आगीमध्ये खालील व्यक्ती भाजून जखमी झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | नाव | वय | जखमी अवस्था |
|---|---|---|---|
| १ | नवनीत लोटे | ३२ | ५०% |
| २ | महेश रामजी मोरे | ४० | ४०% |
| ३ | आसिफ खान | ३२ | ३५% |
| ४ | प्रेमचंद ईश्वर चौहान | २५ | २०% |

E:\APPTT\Census letter... (Repaired).docx

Scanned with CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| | | ५० | २५% |
| ५ | सुखदेव चरणसिंग लोठे | ३५ | ४०% |
| ६ | मंगेश रडक्या रायात | ३० | ४०% |
| ७ | सुनिल गणपत काठया | १७ | ३०% |
| ८ | अजित जयेश दळवी | | |

सदर जखमी व्यक्तींना सेवा नर्सिंग होम डहाणू व संकल्प नर्सिंग होम डहाणू येथे उपचाराकामी दाखल करण्यात आलेले आहे. सोबत तलाठी सजा आगवण यांचेडील अहवालाची प्रत जोडलेली आहे. तसेच डहाणू पोलीस स्टेशन यांनी गुन्हा रजि.नं.५५/२०२१ भादंविसं कलम ३०८,३४ प्रमाणे दि.१७.०६.२०२१ रोजी सदरचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोबत FIR ची प्रत जोडलेली आहे.

हे आपल्या माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

तहसीलदार डहाणू तथा
अध्यक्ष, तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डहाणू

**प्रत:-** मा. सहाय्यक जिल्हाधिकारी डहाणू विभाग डहाणू यांना माहितीसाठी सविनय सादर.

तहसीलदार डहाणू तथा
अध्यक्ष, तालुका आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण डहाणू



Scanned with CamScanner

डहाणू पोलीस ठाणे, जि.पालघर
**Dahanu Police Station, Palghar**
**Phone No.: 02528-222444, Mob No.: 8669604052,**
**Address: Malyan Naka, Dahanu (W) Tal-Dahanu Dist-Palghar.**
**E-mail : dahanu.tr@mahapolice.gov.in**

**Reference No.:-**2641**/2021** **Date :- 18/06/2021**

प्रति,

मा. तहसिलदार सो.

तालुका डहाणू, यांना सविनय सादर

विषय :- विशाल फायर वर्क्स, फटाका कंपनी डेहणे पाटीलपाडा येथे झालेल्या दुर्घटनेबाबत.

महोदय,

(1)

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, डहाणू पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. ५५/२०२१ भादंविसं कलम ३०८, ३४ प्रमाणे दिनांक १७/०६/२०२१ रोजी सदरचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

(2) सदर गुन्हयांतील विशाल फायर वर्क्स ही फटाका कंपनी उर्मिलाबेन जेठामल शहा रा. केशरीमलवाडी मराठी शाळेजवळ जकेरीया रोड, मालाड पुर्व मुंबई यांचे नावे असुन त्यांचे नावे फटाका निर्मिती व विक्रीचे लायसन्स क्र. १) **E/WC/MH/20/67(E22263)** असा असुन त्याची मुदत ३१/०३/२०२३ व २) **E/WC/MH/24/128 (E14899)** असा असुन त्याची मुदत ३१/०३/२०२६ रोजी पावेतो लायसन्स रजिस्ट्रेशन केले आहे.

सदर कंपनीची देखभाल करणारा आरोपी क्रं. २. नरेश मोहनलाल कर्नावट रा. सावटा ता. डहाणू जि. पालघर याने विशाल फायर वर्क्स या फटाका कंपनीमध्ये तयार झालेले सुतळी बॉम्ब कडक होणेसाठी कलरमध्ये भिजवले नंतर ते सुकण्यासाठी जुने खराब झालेले लोखंडी जाळीचे ट्रे व नवीन ट्रे बनविणेचे कॉन्ट्रक्ट यातील आरोपी क्रं. ३ नवदिप दर्शन लोटे रा. आनंद निवास बंगलो, पटेलपाडा डहाणू पुर्व ता. डहाणू जि. पालघर यास दिले होते आरोपी क्रं. ३ हा त्याचे मजुरांना घेवुन कंपनीमध्ये तयार झालेले सुतळी बॉम्ब कडक होणेसाठी कलरमध्ये भिजवले नंतर ते सुकण्यासाठी जुने खराब झालेले लोखंडी जाळीचे ट्रे व नवीन ट्रे बनविणेचे काम चालु केले होते

दिनांक १७/०६/२०२१ रोजी आरोपी क्रं. १ व २ यांचे याचे सांगणेवरुन विशाल फायर वर्क्स या फटाका कंपनीमध्ये वेल्डींग मशीनचे साहायाने जुने खराब झालेले लोखंडी जाळीचे ट्रे व नवीन ट्रे बनविणेचे काम करीत असताना वेल्डींग मशीनमधुन उडणारे ठिणग्या कंपनीत बॉम्ब बनविणे करीता आणून ठेवलेल्या सुतळीचे बंडल, पॅकींगचे बॉक्सवर व कंपनीतील शेडमध्ये जमीनीवर पडलेल्या फटाके बनविण्याचे दारुचे पावडरने पेट घेवून भडका होवून आग लागुन कंपनीत अनेक तिव्र स्वरुपाचे स्फोट होवुन कंपनी पुर्णपणे उधवस्त झालेली असुन सुमारे १५ कि. मी. परिसरामध्ये कंपनीत झालेल्या स्फोटाचे हादरे जाणवले आहेत व कंपनीत काम करणारे ८ कामगार जखमी झालेले आहेत.

सदर गुन्हयामध्ये प्रथम दर्शनी १. उर्मिलाबेन जेठामल शहा रा. केशरीमलवाडी मराठी शाळेजवळ जकेरीया रोड, मालाड पुर्व मुंबई, २. नरेश मोहनलाल कर्नावट रा. सावटा ता. डहाणू जि. पालघर, ३. नवदिप दर्शन लोटे रा. आनंद निवास बंगलो, पटेलपाडा डहाणू पुर्व ता. डहाणू जि. पालघर हे दोषी असल्याचे दिसुन आल्याने त्यांचे विरुद्ध वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास चालु आहे.

टिप :- १) सोबत दाखल गुन्हयांची एफ.आय.आर.ची पत्र जोडलेली आहे.

२) गुन्हयांचे घटनास्थळ हे डेहणे पाटीलपाडा येथील विशाल फायरवर्क्स, या फटाका कंपनीत ता. डहाणू जि. पालघर येथे आहे.

मा. सविनय सादर

( अमोल गवळी )
सहा. पोलीस निरीक्षक
डहाणू पोलीस ठाणे

18/6.

TAG.

Scanned with CamScanner

# FIRST INFORMATION REPORT
## (Under Section 154 Cr.P.C.)
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** पालघर **P.S.(ठाणे):** डहाणु **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0155 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 17/06/2021 23:[illegible] बजे

2. **S.No. (अ.क्र.) Acts (अधिनियम) Sections (कलम)**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भारतीय दंड संहिता १८६० | ३०८ |
| 2 | भारतीय दंड संहिता १८६० | ३४ |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** गुरूवार
   **Date From (दिनांक पासून):** 17/06/2021
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 17/06/2021
   **Time Period (कालावधी):** पहर 4
   **Time From (वेळेपासून):** 10:45 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 10:45 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 17/06/2021 **Time (वेळ):** 22:45 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**
**Entry No. (नोंद क्र.):** 038 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 17/06/2021 22:45 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 12 किमी
**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** डेहणे पाटीलपाडा ,डहाणू, जि पालघर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** नयन सदाशिव डोंगरकर

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |



Scanned with CamScanner

(h) Address (पत्ता):

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पत्ता | 7507742993, डहाणू पोलीस ठाणे,डहाणू,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पत्ता | 7507742993, डहाणू पोलीस ठाणे,डहाणू,डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |

(i) Occupation (व्यवसाय):

(j) Phone number (फोन नं.): Mobile (मोबाइल नं.): 91-7507742993

7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पत्ता) |
|---|---|---|---|---|
| 1 | उर्मिलाबेन जेठामल शहा | | | 1. मालाड पुर्व मुंबई, ,मालाड पुर्व मुंबई, , डहाणु ,पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | नरेश मोहनलाल कर्नावट | | | 1. सावटा ,डहाणू जि पालघर,डहाणु , पालघर,महाराष्ट्र,भारत |
| 3 | नवदिप दर्शन दर्शन लोटे | | | 1. आनंद निवास बंगलो,पटेलपाडा डहाणू पुर्व,ता डहाणू जि पालघर ,डहाणु , पालघर,महाराष्ट्र,भारत |

8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 17/06/2021 मी नयन सदाशिव डोंगरकर, पोना./ 293 नेम. डहाणू पोलीस ठाणे समक्ष पोलीस ठाण्या हजर राहून सरकारतर्फे फिर्याद देतो की, मोनं. 7507742993मी डहाणू पोलीस ठाणेचे नेमणुकित गेले 5 वर्षापासुन असुन सध्या गोपनिय कर्तव्य बजावत आहे. आज दिनांक 17/06/2021 रोजी सकाळी 09.00 वाजता मी डहाणू पोलीस ठाणे येथे कर्तव्यावर हजर झालो व गोपनिय कार्यालयामध्ये कार्यालयीन कामकाज करीत असताना साधारण 10.45 वाजताचे सुमारास सहा. पोलीस निरीक्षक श्री. गवळी यांनी त्यांचे कार्यालयात बोलावून डेहणे पाटीलपाडा येथील विशाल फायर वर्क, या फटाका कंपनीमध्ये आग लागलेली आहे. आपणाला तात्काळ सदर ठिकाणी जायचे आहे. असे कळविले व आम्ही लागलीच सपोनि/गवळी, सहाफौ./पाटील, पोना./गवळी पोना./खांडवी, पोशि./कुंदर्गे असे सरकारी वाहनाने डेहणे पाटीलपाडा येथे रवाना झालो, तेव्हा सपोनि/गवळी यांनी अदानी फायर ब्रिगेड, डहाणू नगरपालीका फायरब्रिगेड, बोईसर एम.आय.डी.सी.फायर ब्रिगेड यांना मोबाईलवरुन संपर्क करुन घटनेच्या ठिकाणी तत्काळ येण्याचे सुचना दिल्या. आम्ही साधारण 11.10 वाजताचे सुमारास घटनेच्या ठिकाणी डेहणे येथील विशाल फायरवर्क या फटाका कंपनीचे ठिकाणी पोहचलो असता विशाल फायरवर्क्स, या फटाका कंपनीमध्ये आग लागल्याचे दिसुन आले. विशाल फायरवर्क या फटाका कंपनीमध्ये असलेले गोडाऊन मधिल फटाका बनविण्याकरीता आणलेल्या स्फोटक पदार्थाचे व तयार फटाक्यांचे एका मागुन एक असे मोठमोठयाने आवाज येत होते. तेव्हा आम्ही घटनेची माहिती घेणेकरीता कोणी माहितगार कर्मचारी त्याठिकाणी आहे का याचा शोध घेतला असता कंपनीत काम करणारा टेम्पो चालक नामे दिलीप महादु इभाड, वय-32 वर्षे रा. चेरी उभडुकपाडा ता. डहाणू जि. पालघर हा मिळुन आला. त्याचेकडे सदर घटनेबाबत चौकशी केली असता त्याने सांगितले की, मी मागील 3 वर्षापासुन विशाल फायरवर्क या फटाका कंपनीत टेम्पो चालक म्हणून नोकरी करीत आहे. आज रोजी सकाळी 08.00 वाजता कामावर आलो व त्यावेळी नेहमीप्रमाणे कंपनीत 50-60 महिला व पुरुष कामगार कामावर आले व त्यांनी त्यांचे दैनंदिन काम सुरु केले. मागील 2 दिवसापासुन कंपनीत तयार होणारे सुतळी बम्ब कडक होणेसाठी कलमध्ये भिजवल्यानंतर ते सुकविण्यासाठी वापरात असलेले जुने खराब झालेले लोखंडी जाळीचे ट्रे व नविन लोखंडी जाळीचे ट्रे बनविण्याचे कॉन्ट्रक्ट नवदिप दर्शन लोटे यांना दिले होते. तेव्हा त्यांनी कंपनीमध्ये



Scanned with CamScanner

वेल्डींग मशिनचा वापर करुन लोखंडी जाळीचे ट्रे बनविण्याचे काम त्याचे मजुरांना घेवून चालु केले होते. आज दिनांक 17/06/2021 रोजी सकाळी 09.00 वाजल्यापासुन कंपनीचे देखभाल करणारे नरेश मोहनलाल कर्नावट यांनी दिलेल्या कॉन्ट्रक्ट प्रमाणे कॉन्ट्रक्टर नवदिप दर्शन लोटे यास परवानगी दिली व कंपनीत स्फोटकाचा साठा आहे हे माहित असताना कॉन्ट्रेक्टर नवदिप लोटे याने त्यांचे कामगारांना घेवून लोखंडी जाळीचे ट्रे वेल्डींग करुन बनवित असताना वेल्डींग करते वेळी होणारे स्पार्किंगच्या ठिणग्या उडुन वेल्डींगचे काम असलेल्या शेडमध्ये जमीनीवर पडलेल्या दारु बनविण्याचे पावडरने पेट घेवून तेथेच जवळ असलेल्या बम्ब बनविण्यासाठी लागणारे सुतळीचे बंडल व पॅकिंग करीता आणलेले कागदी बक्सला आग लागुन भडका उडला. त्यावेळी वेल्डींगचे काम करणारे कामगार हे जखमी झाल्याने आग-आग असा आरडा ओरडा करुन पळु लागले. त्यावेळी मी व कंपनीत काम करणारे इतर महिला पुरष कामगार रस्ता दिसेल त्या दिशेने पळु लागले. थोड्याच वेळात कंपनीत फटाके बनविण्याकरीता आणलेला दारुगोळा व तयार केलेले फटाके यांचा मोठ मोठयाने आवाज होवू लागला. तेव्हा मी देखील कंपनीतुन बाहेर जावून मुख्य रस्त्यावर थांबलो होतो. त्यावेळी कंपनीत कामगारांना ने-आण करणेकरीता कंपनीचे इको गाडीवर ड्रायव्हर म्हणून काम करणारा संजय बारकु मेरे रा. निकावली ता. डहाणू जि. पालघर हा वेल्डींगचे काम करणारे 5 कामगार व इतर कंपनीतील 3 कामगारांना दवाउपचाराकरीता डहाणू येथे घेवून गेला आहे असे सांगितले. त्यानंतर विशाल फायरवर्क, यां कंपनीत लागलेल्या आगीमुळे कंपनीतील स्फोटकांचे आवाज येणे कमी झाल्याने फायरबिग्रेडच्या कर्मचाऱ्यांनी कंपनीत लागलेली आग विझविली. त्यानंतर कंपनीत काम करणारे काही लोक जखमी झाले असुन त्यांना सेवा नर्सिंग होम व संकल्प नर्सिंग होम येथे औषधोपचाराकरीता पाठविण्यात आल्याची माहिती मिळाल्याने सदर हस्पिटलमध्ये मी व पोलीस अंमलदार जावून चौकशी केली असता सेवा नर्सिंग होम मध्ये 1) सुखदेवसिंग चरणसिंग लोटे, वय- 54 वर्षे रा. मसोली आंबेडकर नगर, डहाणू प. ता. डहाणू जि. पालघर, 2) महेश रामजी मोरे, वय- 45 वर्षे रा. डेहणे कासपाडा ता. डहाणू जि. पालघर, 3) आशिफ अकलाक खान, सवय- 26 वर्षे रा. पटेलपाडा बाबुकाका चाळ, डहाणू पुर्व ता. डहाणू जि. पालघर, 4) प्रेमचंद ईश्वर चव्हाण, वय- 22 वर्षे रा. संजयनगर सरावली प्लास्टिक कंपनीजवळ ता. डहाणू जि. पालघर, 5) नवदिप दर्शन लोटे, वय- 27 वर्षे रा. पटेलपाडा आनंद निवास बंगलो, डहाणू पुर्व ता. डहाणू जि. पालघर, व संकल्प नर्सिंग होम, डहाणू पुर्व येथे औषधोपचाराकरीता अँडमिट असलेले 6) मंगेश रडका रायात, वय- 35 वर्षे रा. चरी मेगदेवपाडा ता. डहाणू जि. पालघर, 7) सुनिल गणपत काठया, वय- 30 वर्षे रा. जामशेत वसंतवाडी टाकीपाडा ता. डहाणू जि. पालघर, 8) योगेश मधु करबट, वय- 22 वर्षे रा. सारणी करबटपाडा ता. डहाणू जि. पालघर असे जखमी कामगार औषधोपचाराकरीता ऍडमिट असल्याचे समजले. त्यांचेकडे चौकशी करुन तसे त्यांचे सविस्तर जबाब नोंदविले आहेत. सदर घटनेबाबत आम्ही डहाणू पोलीस ठाण्याचा अभिलेख पडताळुन पाहता विशाल फायरवर्क्स या फटाका कंपनीचे लायसन्स 1) उर्मिलाबेन जेठामल शहा रा. केशरीमलवाडी मराठी शाळेजवळ जकेरीया रोड, मालाड पुर्व मुंबई व नरेश मोहनलाल कर्नावट रा. सावटा ता. डहाणू जि. पालघर यांचे नावे अनुक्रमे 1) E/WC/MH/20/67(E22263) असा असुन त्याची मुदत 31/03/2023 व 2) E/WC/MH/24/128 (E14899) असा असुन त्याची मुदत 31/03/2026 रोजी पावेतो लायसन्स रजिस्ट्रेशन केले असल्याचे दिसुन आले. सदर कंपनीची देखभाल नरोश कर्नावट हे करीत असतात. आम्ही घटनेबाबत केलेल्या प्राथमिक चौकशीत विशाल फायरवर्क्स या फटाका कंपनीमध्ये गेले 3 दिवसापासुन कंपनीमध्ये तयार केलेले सुतळी बंम्ब सकुविण्यासाठी लोखंडी जाळीचे नविन ट्रे बनविण्याचे व जने ट्रे दुरस्तीचे काम नवदिप दर्शन लोटे रा. आनंद निवास बंगलो, पटेलपाडा डहाणू पुर्व यास दिले होते. तो इतर 4 कामगारांना घेवून वेल्डींग मशिनचे सहाय्याने कंपनमध्ये लोखंडी जाळी ट्रे बनविण्याचे काम करीत असताना वेल्डींगचे स्पार्कींगच्या ठिणग्या उडाल्यामुळे कंपनीत सुतळी बॉम्ब बनविण्याकरीता आणलेल्या सुतळीने व कागदी पुठयाचे बॉक्सने व जमीनीवर पडलेल्या फटाके बनविण्याचे दारुचे पावडरने पेट घेतल्यामुळे भडका होवून सदरची आग लागल्याचे दिसुन आले आहे. तरी दिनांक 17/06/2021 रोजी 10.45 वा.चे सुमारास डेहणे पाटीलपाडा येथील विशाल फायर वर्क्स या फटाका कंपनीचे मालक उर्मिलाबेन जेठामल शहा, कंपनीची देखभाल करणारे नरेश मोहनलाल कर्नावट रा. सावटा यांनी दिलेल्या कॉन्ट्रक्ट प्रमाणे कन्ट्रक्टर नवदिप दर्शन लोटे रा. आनंद निवास बंगलो, पटेलपाडा डहाणू पुर्व यास विशाल फायरवर्क्स या फटाका कंपनीत तयार होणारे सुतळी बम्ब सुकविण्यासाठी वेल्डींगचे सहाय्याने जुनी खराब झालेले लोखंडी जाळीचे ट्रे व नविन ट्रे बनविण्याचे काम करण्याची परवानगी दिल्याने कॉन्ट्रक्टर नवदिप दर्शन लोटे याने योग्य ती खबरदारी न घेता व कंपनीत फटाके बनविण्याचे काम करणारे महिला व पुरष कामगार यांना कोणतीही पुर्व कल्पना न देता कंपनीमध्ये ज्वलनशिल पदार्थांचे गोडाऊन व साठा आहे याची कल्पना असताना त्यांनी मानवी जिवीतास धोका होवून दुखापती व क्षती पोचविण्याचा संभव आहे हे माहित असताना बेदरकारपणे व हयगयीने ज्वालाग्रही पदार्थ पासुन सुरक्षीत राहणेस पुरेशी खबरदारी न घेता जाणिवपुर्वक निष्काळजीपणे अपराधीक कृती करुन कंपनीत काम करणारे कामगारांचा सदोष मनुष्यवध करण्याचा प्रयत्न केला. त्यांचे कृत्यामुळे फटाका कंपनीत आग लागुन ज्वालाग्रही पदार्थाचे स्फोट होवून त्यामध्ये कंपनीत काम करणारे व वेल्डींग काम करणारे कामगार 1) सुखदेवसिंग चरणसिंग लोटे, वय- 54 वर्षे रा. मसोली आंबेडकर नगर, डहाणू प. ता. डहाणू जि. पालघर, 2) महेश रामजी मोरे, वय- 45 वर्षे रा. डेहणे कासपाडा ता. डहाणू जि. पालघर, 3) आशिफ अकलाक खान, सवय- 26 वर्षे रा. पटेलपाडा बाबुकाका चाळ, डहाणू पुर्व ता. डहाणू जि. पालघर, 4) प्रेमचंद ईश्वर चव्हाण, वय- 22 वर्षे रा. संजयनगर सरावली प्लास्टिक कंपनीजवळ ता. डहाणू जि. पालघर, 5) मंगेश रडका रायात, वय- 35 वर्षे रा. चरी मेगदेवपाडा ता. डहाणू जि. पालघर, 6) सुनिल गणपत काठया, वय- 30 वर्षे रा. जामशेत वसंतवाडी टाकीपाडा ता. डहाणू जि. पालघर, 7) योगेश मधु करबट, वय- 22 वर्षे रा. सारणी करबटपाडा ता. डहाणू जि. पालघर यांचेसह स्वत: कॉन्ट्रक्टर नवदिप दर्शन लोटे यांना तसेच कंपनीत काम करणारे इतर कामगार यांना किरकोळ व गंभिर स्वरुपाच्या दुखापती करणेस कारणीभुत झाले म्हणून माझी कंपनीचे मालक विशाल फायरवर्क्स या फटाका कंपनीचे मालक उर्मिलाबेन जेठामल शहा, कंपनीची देखभाल करणारे नरेश मोहनलाल कर्नावट रा. सावटा व वेल्डींगचे कॉऍन्ट्रक्टर नवदिप दर्शन लोटे रा. आनंद निवास बंगलो, पटेलपाडा डहाणू यांचे विरुद्ध भादंविसं कलम- 308, 34 प्रमाणे कायदेशिर फिर्याद आहे.



Scanned with CamScanner

13. Action Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at
(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): or (किंवा)

(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव): AMOL GOKUL GAVALI
Rank (पद): SI (Sub-Inspector)
No.(क्र.): DGPAGGM8601 to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)

(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):
District (जिल्हा):
on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)

14. Signature/Thumb impression of the complainant / informant.(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. Date and time of dispatch to the court (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Signature of Officer in charge, Police Station (ठाणे प्रभारी अधिका-याची

Name (नाव): AMOL GOKUL GAVALI
Rank(पद): SI (Sub-Inspector)
No.(सं.): DGPAGGM8601



Scanned with CamScanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):
**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | महिला | | | | | चेचक के दाग: NO |
| 2 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |
| 3 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with CamScanner